२ मुंबई
बुधवार, २३ मे २०१२

वृत्तान्त

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती!

# यशस्वितेच्या शिखरावरील एक व्यवसायः ऑप्टोमेट्री (नेत्रतज्ज्ञ) (advt.)

आरोग्य रक्षणाच्या क्षेत्रातील व्यवसाय आणि करिअर करणाऱ्यांना जनसामान्यांमध्ये एक महत्त्वाचे आणि आदराचे स्थान असते. याच पुढे दृष्टीचे विज्ञान अथवा ऑप्टोमेट्री या विषयाला जनतेची मान्यता मिळाली आहे.

ऑप्टोमेट्री हा आरोग्य रक्षणाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचा भाग असून त्यामध्ये मानवी डोळ्यांच्या विविध विकारांवर उपचार शिकवले जातात. ही नेत्रतज्ज्ञ मंडळी विविध प्रकारे डोळ्यांची काळजी आणि नेत्रविकरांवर उपचार करतात. दृष्टीविज्ञान अथवा ऑथोलॉजी क्षेत्रातील ऑप्टोमेट्री हा सक्षम विषय आहे.

ठाणे शहरातील वावीकर आय इन्स्टिट्यूट ही गेली अनेक वर्षे नेत्रविकार उपचारांसाठी आणि रुग्णांच्या उत्तम काळजीसाठी सतत आघाडीवर आहे. नेत्रविकारांवरील उपचारांसाठी त्यांची अनेकदा प्रशंसा झाली असून त्यांनीच आशिया खंडात सर्वप्रथम अशी ब्लडलेस कॅटरॅक्ट सर्जरी ही मोतीबिंदू उपचार पद्धत अमलात आणली. ही शस्त्रक्रिया अमेरिकेतील यू.एस.एफ.जी.ए.ची मान्यता असलेल्या लेन्सेस लेझरने केली जाते. पश्चिम भारतात एन.ए.बी.एच.ची मान्यता मिळालेली ही पहिली संस्था आहे. त्याशिवाय आय.एस.ओ. ९००१:२००८ ची मान्यताही संस्थेला मिळालेली आहे.

वावीकर आय. इन्स्टिट्यूट यांनी आता कॉलेज



ऑफ ऑप्टोमेट्री ही शैक्षणिक संस्था सुरू केली असून त्यामध्ये ऑप्टोमेट्री या क्षेत्रातील पदवी आणि पदविका अभ्यासक्रम चालवले जातात. पदवी अभ्यासक्रम पूर्णवेळ असा ४ वर्षांचा असून त्यात ३ वर्षे शैक्षणिक आणि १ वर्ष रुग्णालयात प्रत्यक्ष काम म्हणजे इंटर्नशिप आहे. प्रवेश पात्रता बारावी विज्ञान आहे.

दहावी अथवा एच.एस.सी. परीक्षा किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम असून तो २ वर्षे मुदतीचा आहे. यात शैक्षणिक आणि इंटर्नशिप हे दोन्ही भाग आहेत. ऑप्टोमेट्रिस्ट म्हणून पदवी पूर्ण करणाऱ्यांसाठी उत्तम अर्थार्जन करण्याच्या अनेक आकर्षक संधी उपलब्ध आहेत. त्यात शिक्षण क्षेत्रात भारत तसेच परदेशातही संधी आहेत. त्याच वेळी ऑप्टोमेट्रिस्ट स्वतःचा नेत्रतज्ज्ञ म्हणून व्यवसायही सुरू करून जनमानसात आपली उत्तम प्रतिमा निर्माण करू शकतात. यासाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत.

केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात ऑप्टोमेट्री हा व्यवसाय सर्वोच्च अर्थार्जन देणाऱ्या दहा व्यवसायांमध्ये गणला जातो. या विद्यार्थ्यांना अमेरिका आणि अरब देशांमध्ये उत्तम संधी आहेत. वावीकर आय इन्सिट्यूट ही एकूण ३५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या संस्थेत अतिशय अद्ययावत उपकरणांसह सहा शस्त्रक्रिया कक्ष (ऑपरेशन थिएटर्स) आहेत. डोळ्यांची काळजी घेण्याच्या क्षेत्रात ही संस्था भारतात आदराची मानली जाते.

काही विद्यार्थ्यांसाठी संस्थेत १०० टक्के शिष्यवृत्तीचीही व्यवस्था आहे. त्याशिवायही इतर विद्यार्थी आणि त्यांची दोन अथवा तीन वर्षांत नोकरी करून कमवू शकतात. याचे कारण म्हणजे संपूर्ण जगात असलेली तज्ज्ञ अशा ऑप्टोमेट्रिस्टची गरज. ऑप्टोमेट्रीच्या क्षेत्रासाठी एक खास मार्गदर्शन शिबीर २ जून २०१२ रोजी दुपारी २ ते २ दरम्यान वावीकर आय इन्स्टिट्यूट, ठाणे येथे घेण्यात येणार आहे. यात तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच शिष्यवृत्तीसंबंधी माहिती दिली जाईल.

नोंदणीसाठी त्वरित संपर्क साधा, कारण जागा मोजक्या आहेत. वैभवी : ०९८२०३९९२२८ किंवा रूपाली : ०९८९२८७३८८१. आपण आमच्या संकेतस्थळालाही भेट देऊन शकता.

www.wavikareyeinstitute/college-of-optometry.php

डान्स फॉर्म शिकण्याचा प्रयत्न    पुराणिक (नाव बदललं आहे) येतात. त्यांच्या

# ठाण्यात सुसज्ज नेत्र रुग्णालय

अंधत्वावर मात करण्यासाठी तसंच डोळ्यांच्या छोट्या-मोठ्या तक्रारींसाठी आता ठाणेकरांना शहराबाहेर जाण्याची आवश्यकता नाही. कारण पश्चिम भारतातलं सर्वात भव्य आणि एकाच छताखाली सर्व अद्ययावत उपचारांची सुविधा उपलब्ध असलेलं नेत्र रुग्णालय ठाण्यात साकारलं गेलं आहे. निःस्वार्थी भावनेने सामाजिक भान जपल्यास अंधारावर निश्चित मात करता येते, अशा शब्दांत सुप्रसिद्ध नेत्रविशारद पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी या रुग्णालयास भेट देऊन आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

डॉ. चंद्रशेखर वावीकर यांनी ३५ हजार चौ. फूट जागेवर हे रुग्णालय उभारलं आहे. दूरवर राहणाऱ्या रुग्णांना जाण्या-येण्यासाठी बससेवाही मोफत उपलब्ध करून दिली आहे.

वावीकर आय इन्स्टिट्यूटने 'इंदिराबाई चॅरिटेबल विंग' आणि 'विश्वनाथ आय बँक' हे दोन विभाग अधिक सेवातत्पर करण्याचं ठरवलं असल्याची माहिती डॉ. वैशाली वावीकर यांनी दिली. ठाणे जिल्ह्याच्या अतिमागास भागातल्या गरीब आदिवासींना नेत्रसुरक्षा पुरवण्यासाठी 'इंदिराबाई चॅरिटेबल विंग' मोठ्या प्रमाणावर नेत्रशिबिरांचं आयोजन करणार आहे. तर 'विश्वनाथ आय बँके'मार्फत नेत्रदानविषयक जनजागृती केली जाणार आहेत. डोळ्यांच्या तपासणीसाठी स्वतंत्र कक्ष, सहा ऑपरेशन थिएटर्स, मुलांसाठी स्वतंत्र उपचार सोय, आय ब्युटिफिकेशनची स्वतंत्र सुविधा, ऑडिटोरियम, उत्कृष्ट तंत्रज्ञान आणि कुशल वैद्यकीय सेवा आदी अनेक सुविधांनी ही आय इन्स्टिट्यूट सुसज्ज आहे.

